3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास
सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज
ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४५७ वा • शनिवार, ता. २९ नोव्हेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## ४,५०० कोटींच्या सिडको जमीन घोटाळा चौकशी सुरू; शिंदेसेनेचे मंत्री अडचणीत?

**मुंबई । रयत समाचार**

राज्यात चर्चेत असलेल्या सिडकोच्या ४,५०० कोटी रुपयांच्या कथित जमीन घोटाळ्याची अखेर चौकशी होणार आहे. राज्य सरकारने या प्रकरणी कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत केली आहे. ही समिति यशवंत बिवलकर यांच्याशी संबंधित जमिनींची संपूर्ण चौकशी करणार असून त्यात मुख्य वन संरक्षक ठाणे, जिल्हाधिकारी रायगड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक



तसेच भूमापन अधिकारी रायगड आणि ठाणे यांचा समावेश करण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी माजी सिडको प्रमुख संजय शिरसाट यांनी पदाचा गैरवापर करून यशवंत बिवलकर यांना ४,५०० कोटी रुपयांची मौल्यवान जमीन दिल्याचा गंभीर आरोप केला होता. यावर सरकारकडून कारवाईची मागणी वाढत असल्याने तात्काळ समिती स्थापन करण्याचे निर्देश मुख्य सचिवांनी नोव्हेंबर महिन्यात दिले.

तथापि, आमदार रोहित पवार यांनी स्थापन केलेल्या समितीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ज्या अधिकाऱ्याने जमीन अलोट करण्याची शिफारस केली, तोच अधिकारी आता समितीत सचिव म्हणून असल्याची बाब त्यांनी समोर आणली. ''आजची समिती म्हणजे चोरालाच पोलीस बनवल्यासारखं आहे. निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी व्हायला हवी,'' अशी मागणी पवार यांनी केली.

या प्रकरणी वन विभागाने पोलिसांना गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले असले तरी दीड महिना उलटूनही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे चौकशी समितीच्या कामकाजावर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महा-देवा उपक्रमातून ग्रामीण फुटबॉलला नवी चालना

मुंबई । रयत समाचार

राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील फुटबॉल प्रतिभेला राज्यस्तरीय मंच मिळावा यासाठी 'महा-देवा फुटबॉल उपक्रम' राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या ६० मुला-मुलींना विशेष फुटबॉल प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री अ‍ॅड. माणिक कोकाटे यांनी दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाऊंडेशन यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला.

यासर्व संस्थांच्या संयुक्त पुढाकाराने राज्यातील



ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील उदयोन्मुख फुटबॉलपटूंना तांत्रिक प्रशिक्षण, शारीरिक घडण, सुविधा आणि स्पर्धात्मक संधी उपलब्ध होणार आहेत.

क्रीडा मंत्री कोकाटे यांनी सांगितले, ग्रामीण मुलांमध्ये मोठी क्षमता आहे; योग्य प्रशिक्षण मिळाले तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ते नक्कीच झेप घेऊ शकतात. महा- देवा उपक्रम ही त्यांना मिळालेली मोठी संधी आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग २०२६ स्पर्धापरीक्षा अंदाजित वेळापत्रक जाहीर

स्वसुख निरभिलाषः खिद्यते लोकहेतोः
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२६ मधील विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक जाहीर केले आहे. राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थ्यांसाठी ही महत्त्वाची माहिती असून, आगामी वर्षातील मुख्य, पूर्व व इतर विभागीय परीक्षांची तारीख आता स्पष्ट झाली आहे. आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २०२६ वर्षातील प्रमुख भरती प्रक्रिया, त्यांची संभाव्य परीक्षा दिनांक, तसेच संबंधित अधिसूचना कधी प्रसिद्ध होणार याची माहितीही देण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षांबाबतची अधिकृत व अद्ययावत माहिती तसेच सुधारित वेळापत्रक पाहण्यासाठी उमेदवारांनी आयोगाच्या www.mpsc.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तपशीलवार अंदाजित वेळापत्रक खालील लिंकवर उपलब्ध आहे : https://mahasamvad.in/185086/

**आपला वाढदिवस रक्तदानाने साजरा करा**

## भूखंड माफियांच्या हाती नगरपरिषदेची सत्ता द्यायची का- आमदार राजळे

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

नगरपरिषदेच्या मालकीचे भूखंड बळकावत त्यांनी शॉपिंग कॉप्लेक्स उभारले आहेत. त्यांच्या हाती सत्ता दिल्यास ते आपली घरे व भूखंडही त्यांच्या नावावर करून घेतल्याशिवाय राहणार नसल्याने अशा भूखंड माफियांच्या हाती नगर परिषदेची सत्ता द्यायची का, अशी टीका आमदार मोनिका राजळे यांनी केली.

खोलेश्वर मंदिराच्या आवारात आयोजित नगर परिषदेच्या प्रचार सभेत राजळे बोलत होत्या. यावेळी भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अभय आव्हाड, भाजप निरीक्षक विनायक देशमुख ,गीता गिल्डा, अ‍ॅड. विवेक नाईक, सचिन कुसळकर,जेष्ठ नेते अशोक गर्जे, नारायण धस, हिंदकुमार औटी, रामकिसन काकडे, सचिन वायकर, प्राचार्य अजय भंडारी, अर्चना चौधरी, बंडू पठाडे, अशोक चोरमले, डॉ. मृत्युंजय गर्जे, रमेश गोरे, डॉ. रमेश हंडाळ, कवित आव्हाड, मनीषा घुले, ज्योती शर्मा, काशीबाई गोल्हार उपस्थित होते. दरम्यान, अभय आव्हाड यांनी भाजपाच्या उमेदवारांचा परिचय करून दिला.

यावेळी आमदार राजळे म्हणाल्या



की, पाथर्डी शहराचे भवितव्य कुणाच्या हातात द्यायचे हे ठरवणारी ही निवडणूक आहे. अपवाद वगळता तालुक्यातील जनतेने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची सत्ता राजळे कुटुंब व भाजपाच्या ताब्यात दिल्याने त्याची उतराई करण्याचे काम आम्ही करत आहोत. तुमच्याकडे संपत्ती किती आहे, यापेक्षा तुम्ही किती माणसे कमावली ते महत्वाचे आहे. गेल्या ११ वर्षाच्या काळात नगर परिषदेच्या माध्यमातून अनेक विकासकामे झाली. ही कामे करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची मोलाची साथ मिळाली. पाथर्डी तालुक्यात आता एमआयडीसी आणायची आहे. विरोधकांचे डोळे आले असल्याने त्यांना आपण केलेला विकास दिसत नाही. एखाद्याला पुढे करून चुकीचे बोलायला लावून समाजात तेढ निर्माण केली जात आहे. परंतु, दादाभाई चौधरी व राजळे कुटुंबाचे खूप घनिष्ठ नाते आहे. आम्ही एकमेकांच्या सुखदुः खात सहभागी - होत असतो. मी मुस्लिम समाजासाठी काहीच केले नाही म्हणणाऱ्यांनी एकदा कसबा विभागात फिरून यावे. निवडणूका आल्या की ते बाहेर पडतात. तालुक्यातील विकास कामे तालुक्यातीलच ठेकेदार करतील. आपल्या तालुक्यातील ठेकेदार मोठे व्हायला नको का ? लोकसभा निवडणुकीत चूक झाली. ते खासदार झाल्यावर त्यांनी शहरासाठी कोणता निधी दिला हे त्यांना विचारा. लोकसभेत केली तशी चूक यावेळी करू नका. चुकीचा निर्णय घेतला तर योग्य ठरणार नाही. देशावर प्रेम करणाऱ्या तरुणांच्या हाती सत्ता द्यायची की भूखंड माफियांच्या हाती द्यायची याचा विचार करा. या निवडणुकीत अभय आव्हाड हे उभे नसून, मी उभी आहे असे समजून मतदान करा व २१ जागेवरही भाजपच्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन शेवटी राजळे यांनी केले.

यावेळी अभय आव्हाड म्हणाले, माझे वडील स्वर्गीय बाबूजी आव्हाड हे कम्युनिस्ट विचारसरणी मानणारे होते. ते प्रवासही एसटीच्या बसने करत होते. त्यांचे संचित आम्ही कष्ट करून वाढवले असून बापजाद्याच्या इस्टेटीवर मी मजा करत नाही. माझ्यात दानत आहे म्हणून मी गरिबांना मदत करतो. मोनिकाताईंवर मोठा आघात होऊनही त्यांनी स्वकर्तृत्वावर विधानसभेची हॅट्रिक केली. त्यांच्यावर टीका करताना त्यांनी शहरात किती विकासकामे केली तीही पहा. अजंठाचौकात त्या आता छत्रपती शिवरायांचा कोट्यवधी रुपयांचा पुतळा उभारणार आहेत. मी १० वर्षांपासून पालिकेच्या सत्तेत नसतानाही माझ्यावर टीका केली जाते. मी लहान मुलांशी गोड बोललो तरी ते टीका करतात. मी दादागिरी करणारा माणूस नाही. निवडणुकीपुरते येणाऱ्या नेत्यांच्या हातात एकदा बाजार समितीची सत्ता दिली तर तिचाही त्यांनी खेळखंडोबा केला. मोनिकाताईंनी त्यांना चितपट केले आहे. या निवडणुकीत २१ विरोधात शून्य करा. विकास काय असतो तो दाखवून देऊ. या निवडणुकीत मी नाही तर मोनिकाताई राजळे उभे असल्याचे शेवटी आव्हाड म्हणाले. सभा संपल्यानंतर राजळे यांच्या नेतृत्वाखाली शहरातून रॅली काढण्यात आली.

> विरोधकांनी आपल्या पॅनलमधील उमेदवारांना सोडून दिले आहे. ते सध्या फक्त स्वतःसाठी एक मत मागत आहेत. आम्ही ३ मते मागतो. सध्या वेगळीच प्रचार यंत्रणा सुरु झाली असून १ हजार रुपये देतात आणि वर एक १० रुपयांची नोटेला खून करून ती पण देतात. मी निवडून आलो तर खून केलेली नोट घेऊन या व आणखी पैसे घेऊन जा, अन मत दिले नाही तर पैसे वसूल करू अशी धमकीही देत असल्याचे आमदार मोनिका राजळे म्हणाल्या.

**शिवराज्यस्वराज्यसंविधान**

## संगीत प्रवचनातून उलगडणार लोकशाहीचे मूल्य

**चिंचवड । रयत समाचार**

संविधान दिनानिमित्त चिंचवडमधील विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने 'संत, स्वराज्य आणि संविधान' या अनोख्या संगीत प्रवचनाचा कार्यक्रम रविवारी दुपारी चैतन्य सभागृह, बिजलीनगर रोड येथे आयोजित करण्यात आला आहे.

मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, छावा मराठा युवा महासंघ, बारा बलुतेदार महासंघ, संविधान सन्मान मंच, संविधान जागर अभियान आदी पुरोगामी संस्थांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला असून संविधानाबद्दल जनजागृती हा त्यामागील मुख्य हेतू




आहे.

या विशेष कार्यक्रमात संत परंपरेतील सामाजिक मूल्ये, छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख राज्यकारभारातील लोकशाहीची बीजे आणि स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने घडवलेली आधुनिक लोकशाही व्यवस्था या तिन्हींचे परस्परसंबंध संगीत, प्रवचन व विचारमंथनाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले जाणार आहेत. तसेच संविधानातील मूलभूत मूल्यांची आजच्या समाजातील उपयुक्तता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्या यावरही प्रकाश टाकण्यात येईल.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संविधान, स्वराज्य आणि संत परंपरेतील मूल्यांची ओळख करून घ्यावी, असे आवाहन आयोजक सतीश काळे आणि श्रीकृष्ण यांनी केले.

## ३० नोव्हेंबरला डॉ. डी.एन. मिश्रांच्या 'द हार्बिंजर' गौरवग्रंथाचे प्रकाशन

### सॅफायर ज्युबिलीनिमित्त विशेष कार्यक्रम

**पुणे । रयत समाचार**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी प्र-उपकुलगुरू डॉ. देबेंद्रनाथ मिश्र यांच्या सॅफायर ज्युबिली म्हणजेच ६५वा वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार सोहळा आणि ' ' या गौरवग्रंथाचे प्रकाशन ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुण्यात होणार आहे. कार्यक्रम रत्ना वेज क्यूझिन, ऑर्किड बँक्वेट, काकडे प्लाझा, वारजे रोड, पुणे येथे सकाळी ११ वाजता होईल.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणूण श्रीस्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ नागपूरचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन. पठाण तर अध्यक्ष म्हणून व लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे आणि विशेष अतिथी म्हणून नागपूर माजी कुलगुरू डॉ. एस.पी. काने उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. शैला बुटवाला, डॉ. जे. एस. दर्गड, आणि डॉ. लक्ष्मण




के. त्रिपाठी यांचीही विशेष उपस्थिती राहतील.

'द हार्बिंजर' या गौरवग्रंथात डॉ. मिश्रांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय योगदानाचा आढावा देणारे लेख, आठवणी आणि विद्यार्थ्यांचे मनोगत समाविष्ट आहेत. ग्रंथाचे संपादन डॉ. नितीन आर. साळवे आणि डॉ. कोमल एस. गोमरे यांनी केले आहे. सत्कार सोहळ्यानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक समितीने दिली.

## निवडणूक प्रचाराला १ डिसेंबर रात्री १० वाजेपर्यंत परवानगी

### राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई । रयत समाचार**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीच्या जाहीर प्रचारासाठीचा कालावधी वाढवण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. सामान्यतः मतदानाच्या आदल्या दिवशी संपूर्ण दिवस 'जाहीर प्रचारबंदी' लागू असते. मात्र यावेळी ता.२ डिसेंबर रोजी मतदान होत असल्याने १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजेपर्यंत प्रचाराची खास सवलत देण्यात आली आहे.

'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार ही सूट देण्यात आली असून, त्यानंतर लगेचच प्रचारबंदी लागू होईल. रात्री १० नंतर कोणतीही सभा, मोर्चा अथवा ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणुकीसंबंधी जाहिरातींचाही प्रसार पूर्णतः बंद राहणार आहे.

या निर्णयामुळे उमेदवारांना अतिरिक्त वेळ मिळणार असला तरी मतदानाच्या आधीची रात्र संवेदनशील बनण्याची शक्यता, प्रशासन यावेळी विशेष लक्ष ठेवून आहे. 'लक्ष्मी दर्शन'च्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अधिक चर्चेत आला आहे.

## राजेश अग्रवाल महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची राज्याचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार हे ३० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून, त्याच दिवशी राजेश अग्रवाल नवे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. या नियुक्तीबाबत शासनाने अधिकृत आदेश जारी केले असून, अग्रवाल यांना मनोनित केल्याबद्दल प्रशासकीय वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# धार्मिक द्वेषाला आळा घालण्यासाठी संविधान जागर आवश्यक- प्रा. सोनकांबळे

## संविधान जागर रॅलीद्वारे सर्वधर्मसमभाव संदेश देत, संविधानिक मुल्यांची जनजागृती

**अहमदनगर । आबीद खान**

व्यक्ती किंवा राजकीय पक्ष काय सांगतात यापेक्षा जनतेला स्वतःच्या मनातील आवाज समजला, तरच संविधान खऱ्या अर्थाने यशस्वी होईल, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते. आज या विचाराची गरज अधिक जाणवते, धार्मिक द्वेषाला आळा घालण्यासाठी संविधान जागर आवश्यक असे मत एमजीएम विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एच. एम. सोनकांबळे यांनी व्यक्त केले.




संविधान दिनानिमित्त मानवाधिकार अभियान, सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय तसेच विविध समविचारी संघटनांच्या वतीने शहरात संविधान जागर रॅली आयोजित करण्यात आली. रॅलीनंतर सीएसआरडी येथे झालेल्या व्याख्यानात सोनकांबळे बोलत होते.कार्यक्रमाला सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, स्वागताध्यक्ष प्रा. सुभाष वारे, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, मानवाधिकार अभियानचे ॲड. संतोष गायकवाड, संध्या मेढे, लबडे, संजीव देठे आदी उपस्थित होते.

सोनकांबळे म्हणाले की, संविधान यशस्वी होण्यासाठी ते राबविणाऱ्यांची बांधिलकी महत्त्वाची आहे, असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. धर्माचे राजकारणात आगमन झाले तर लोकशाही धोक्यात येईल, असा त्यांचा इशारा आज सत्य ठरत असल्याचे ते म्हणाले. राजकीय समता मिळाली असली तरी आर्थिक आणि सामाजिक समता अद्याप साध्य झालेली नाही. म्हणूनच समाजात जातीय आणि धार्मिक तणाव दिसतो. जनतेच्या मनातील आवाज आज दडपला जात असल्याने संविधान जागर अधिक महत्त्वाचा झाला आहे.

कोरगंटीवार म्हणाले की, जिल्ह्यात ॲट्रॉसिटीचे गुन्हे चिंताजनक प्रमाणात वाढत आहेत. कायद्यात कठोर तरतुदी असल्या, तरी समाजातील पूर्वग्रह आणि भेदभावाची मानसिकता पूर्णपणे बदलली नाही, अस्पृश्यतेवर कायद्याने बंदी आहे, परंतु ती केवळ कायद्यापुरती न राहता मनातूनही नष्ट होणे गरजेचे आहे. मानवी सन्मान हा संविधानाचा केंद्रबिंदू असून, तो प्रत्यक्षात उतरला तरच समानतेचे समाजव्यवस्थेकडे वाटचाल होईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. सुरेश पठारे यांनी आपल्या भाषणात संविधानातील मूलभूत मूल्यांवर सर्वांनी एकत्र येऊन चिंतन करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, संविधान पुस्तकात आहे म्हणून चालते, असे नसून ते दैनंदिन जीवनात व आचरणात आले पाहिजे. लोकशाही, स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुता ही मूल्ये केवळ शब्द नसून समाज घडवण्याचे आधारस्तंभ आहेत. आजच्या विभाजनकारी वातावरणात ही मूल्ये अधिक दृढ करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, असे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक करताना प्रा. सुभाष वारे म्हणाले की, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि संविधान दिन हे तीनही दिवस केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता देशभर सणासारखे साजरे व्हायला हवेत. कारण हे तीन दिवस आपल्याला मूल्याधिष्ठित राष्ट्राची जाण करून देतात. प्रत्येक भारतीयाचा सहभाग या कार्यक्रमांमध्ये असणे आवश्यक आहे. देशात समतेची भावना दृढ करण्यासाठी युवकांनी संविधानाचे अध्ययन करणे, त्यातील तरतुदी समजून घेणे आणि समाजात त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. संविधानाचा आत्मा जनतेत पोहोचला तरच लोकशाही अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संध्या मेढे यांनी संविधानाचे वाचन केले.जन गण मन राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सॅम्युअल वाघमारे यांनी केले. आभार अशोक सब्बन यांनी मानले. सभागृहात विद्यार्थी रियांश पासकंटी यांनी डॉ. आंबेडकरांची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून संविधान रॅलीला प्रारंभ झाला. कोरगंटीवार यांच्या हस्ते रॅलीची सुरुवात झाली. धर्मगुरू रेव्ह. जे.आर.वाघमारे, हभप अजय महाराज बारस्कर, अमित महाराज, युनूस तांबटकर, डॉ. प्रशांत शिंदे,आबीद दुलेखान,डॉ.सुरेश मुगुटमल,प्रा. डॉ. महेबुब सय्यद, डॉ.जेमोन वर्गीस, डॉ.विजय संसारे, डॉ. प्रदीप जारे, विकास कांबळे, संजय झिंजे, कॉ. भैरवनाथ वाकळे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वधर्मसमभाव हा संदेश यामधून देण्यात आला.

रॅलीत नागरिक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसला. शिवाजी नाईकवाडी यांनी संविधान जागृतीची गीते सादर केली.

# महात्मा फुले यांच्या तेजोमय विचारांनी सत्यधर्माचा उदय- ॲड. आगरकर

**अहमदनगर । रयत समाचार**

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर देवस्थान तर्फे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत समाजजागृतीचा संदेश दिला.



ॲड. आगरकर म्हणाले की, ''अज्ञान, दारिद्र्य आणि सामाजिक चक्रव्यूहात अडकलेल्या बहुजन समाजाला महात्मा फुले यांनी मुक्तीचा मार्ग दाखवला. हजारो वर्षांची गुलामगिरी, जातपात भेद, अंधश्रद्धा आणि रूढींनी ग्रस्त झालेल्या समाजात त्यांनी जागृतीची पहाट उजाडली. सामाजिक गुलामगिरीच्या अंधारात प्रकाशाचा किरण ठरून महात्मा फुले यांनी सत्यधर्माची नवी पहाट निर्माण केली.''

समाज परिवर्तनाची नांदी देत, खितपत पडलेल्या समाजाला उत्सर्जित स्थिती प्राप्त करून देण्यात महात्मा फुले यांचे योगदान अनन्यसाधारण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, पांडूरंग नन्नवरे, ज्ञानेश्वर रासकर, रंगनाथ फुलसोंदर, प्रा. माणिक विधाते, नितीन पुंड, कुमार वाकळे, गणेश राऊत, आनंद पुंड आदी मान्यवर उपस्थित होते. श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानच्यावतीने झालेल्या या अभिवादन कार्यक्रमात महात्मा फुले यांच्या कार्याचा पुनः स्मरण करत समाजजागृतीचा संदेश देण्यात आला.

# समाजातील दुर्बल, गरजू व असहाय्य व्यक्तींना निस्वार्थ मदत करणे हाच साईमार्ग– हभप बिलाडे

**अहमदनगर । विजय मते**

''जीवनात कितीही संकटे आली, तरी धैर्य, संयम आणि देवावरील अढळ विश्वास जर टिकवला, तर साईबाबांची कृपा आपल्यावर कायम राहते. समाजातील दुर्बल, गरजू आणि असहाय्य व्यक्तींना निस्वार्थ मदत करणे हाच साईमार्ग आहे,'' असे प्रेरणादायी प्रतिपादन हभप नामदेव आप्पा बिलाडे महाराज यांनी केले. त्यांच्या प्रभावी कीर्तनाने भाविकांच्या डोळ्यांत भावभावनांचे अश्रू तरळले.



वसंतटेकडी, संदेशनगर येथील श्री साई मंदिरात गुरुवार, ता. २७ रोजी बिलाडे महाराज यांच्या साईचरित्रावर आधारित कीर्तनाने मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमाची सुरुवात नवदांपत्याच्या हस्ते श्री साईबाबांच्या आरतीने झाली. त्यानंतर साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठान तर्फे महाराजांचा आणि नवदांपत्याचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, देविदास डहाळे, बबनराव नांगरे, आकाश व रोशनी त्र्यंबके, भाग्यश्री पोकळे, रेखा उकिरडे, अनिषा निक्रड, कावेरी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

साईबाबांच्याजीवनातील 'श्रद्धासबुरी'ची शिकवण कीर्तनात बिलाडे महाराजांनी साईबाबांच्या प्रमुख घटनांचे प्रभावी वर्णन करत सांगितले की ''साईबाबांनी कधीही जातीपातीचे भेद मानले नाहीत. त्यांच्या दारात येणारा प्रत्येकजण आपलाच. दया, करुणा, समता आणि निस्वार्थ सेवा हेच साईबाबांच्या जीवनाचे सार आहे. समाजातील कलह, मतभेद आणि भेदभाव दूर करायचे असतील तर साईबाबांचा आदर्श आचरणात आणणे आवश्यक आहे.'' कठीण प्रसंगात श्रद्धा आणि सबुरीचा आधारच खरा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सांगता साई महाप्रसादाने झाली. मोठ्या संख्येने जमलेल्या भाविकांनी महाराजांच्या कीर्तनाचा अनुभव अविस्मरणीय असल्याचे सांगून कार्यक्रमाचे कौतुक केले.

# पद्माकर पाठक यांनी 'सिनेमाच्या गोष्टी'तून उलगडल्या दुर्मिळ स्मृती

**अहमदनगर । आबीद खान**

हमारी याद आयेगी प्रस्तुत सातारा येथील पद्माकर पाठक यांनी सादर केलेल्या ''सिनेमाच्या अनवट गोष्टी'' या निवेदनात्मक कार्यक्रमात हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील अनेक विस्मयकारक आठवणींना उजाळा देत रसिकांना मंत्रमुग्ध केले. अनाडी, मुगल–ए–आझम, गाईड, अनारकली यांसारख्या क्लासिक चित्रपटांतील अविस्मरणीय प्रसंग, संवाद, गाणी आणि कलाकार देव आनंद, राज कपूर, दिलीपकुमार, नूतन, मधुबाला, नर्गिस, कामिनी कौशल यांच्याशी संबंधित दुर्मिळ किस्से त्यांनी प्रभावी शैलीत मांडले.



निवेदनातील प्रत्येक गोष्ट जिवंत होत असल्याचा भास निर्माण झाल्याने कार्यक्रमाच्या अखेरीस अनेक ज्येष्ठ रसिकांच्या डोळ्यांत जुन्या आठवणींची दाट भावधारा तरळली. कार्यक्रमानंतर पाठक यांच्याभोवती रसिकांची गर्दी उसळली आणि ''मनात खोलवर जागा करून ठेवणारा कार्यक्रम'' असा प्रतिसाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रसाद शेटे यांच्या आवाजातील ''ये दिल ना होता बेचारा'', ''जिंदगी कैसी है पहेली'', ''मधुबन मे राधिका'' इत्यादी सुरेल गीतांनी झाली. सईद खान, आराधना गायकवाड यांनीही लता, रफी यांच्या लोकप्रिय गाण्यांनी रसिकांना मोहित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अहिल्यानगर आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे आणि पद्माकर पाठक उपस्थित होते. दिलीप कुमारमधुबाला यांच्यातील मतभेद असूनही मुगल–ए–आझममधील त्यांच्या भूमिकेत एकही दुरावा जाणवत नाही, हे उदाहरण देत पाठक यांनी कलाकारांच्या व्यावसायिकतेचे कौतुक केले. अनाडी चित्रपटातील ''सब कुछ सीखा हमने'' या गीतामागील आठवणी सांगताना प्रेक्षकांच्या मनात प्रत्यक्ष प्रसंग उभा राहिल्यासारखे वाटले.

नंदकिशोर आढाव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ''पाठकसारखे सुवर्णकाळातील चित्रपटांचे तज्ञ आणि निवेदक दुर्मिळच. त्यांचे निवेदन म्हणजे जुन्या काळातील सिनेमा प्रत्यक्ष डोळ्यांसमोर जिवंत होण्याचा अनुभव.''

अहिल्यानगर आकाशवाणीवर दररोज रात्री रजनीगंधा या कार्यक्रमातून जुन्या सदाबहार गाण्यांचे प्रसारण होते, याचा उल्लेख करत आढाव यांनी २००४ साली नगरात अनमोल नजराणा दिनदर्शिकेच्या प्रकाशनाच्या आठवणीही सांगितल्या.

सुदाम बटुळे यांचा सत्कार करण्यासोबतच दिलीप अकोलकर यांनी आपल्या संग्रहातील ''शर्त'' चित्रपटाची गीतांची दुर्मिळ रेकॉर्ड सादर केली. त्यांनी सांगितले की, तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात अशा रेकॉर्ड्स आता ॲंटिक पीस ठरत आहेत.

कार्यक्रमाचे निवेदन आर. जे. कोमल यांनी अभ्यासपूर्ण माहिती, कलाकारांचे परिचय आणि सहजसुंदर सूत्रसंचालनाने भारदस्त केले.विठ्ठल पाठक, अशोक करंदीकर, पागे, गोरे, पोंदे, मिलिंद वैद्य, पत्रकार आबीद खान, भगवान राऊत, दासरी, राजहंस कोरे तसेच काळे, साळवे, कटारिया, कुसुम, प्रांजली आढाव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला नगरकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आयोजकांनी समाधान व्यक्त केले.

# राष्ट्रवादी कॉँग्रेसकडून महात्मा फुले यांना अभिवादन

**अहमदनगर । रयत समाचार**

''शिक्षणाशिवाय प्रगती नाही हे ओळखून, स्त्री शिक्षण हा समाजपरिवर्तनाचा पाया आहे हे महात्मा ज्योतिराव फुले यांनी सिद्ध केले. आजचा शिक्षित समाज त्यांच्या कार्याचा मूर्त प्रत्यय आहे,'' असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार पक्ष) चे शहरजिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी केले.

महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त पक्षाच्यावतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांच्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या समाजसुधारक कार्याचे स्मरण करण्यात आले.

कळमकर म्हणाले की, ''महात्मा ज्योतिबा फुले हे लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचार मांडले. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या विचारांची परंपरा नवीन पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.'' संजय झिंजे यांनीही आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला.



कार्यक्रमास कार्याध्यक्ष नामदेव पवार, संजय झिंजे, रोहन शेलार, समीर पठाण, अंकुश खरात, राजेंद्र झेंडे, रामदास झीने, प्रमोद आढाव, राहुल घोरपडे, गौरव शेटे, चेतन्य ससे, अभिषेक जगताप, परवेज शेख, रामवाणी आदींची उपस्थिती होती.

## तपोवन परिसरातील बिबट जेरबंद

**अहमदनगर । रयत समाचार**

तपोवन परिसरात फिरणारा बिबट्या अखेर वनविभागाच्या जाळ्यात अडकला आहे. गेल्या तीनचार दिवसांपासून या भागात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. २५ नोव्हेंबर रोजी कराळे मळ्यात बिबट्याची तीन पिल्ले वनविभागाने ताब्यात घेतली होती. त्यानंतर परिसरात पिंजरा लावण्यात आला होता. काल ता. २८ रोजी पहाटे या पिंजऱ्यात बिबट्या अडकला आणि वनविभागाने त्याला सुरक्षितरीत्या जेरबंद केले. ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली होती. वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल व वनरक्षकांनी तपोवन परिसरातून बिबट्याला ताब्यात घेतले. वनविभागाच्या या कारवाईमुळे स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

## घरगुती हिंसाचार प्रकरणात ‘कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर’

### उच्च न्यायालयकडून प्रकरण रद्द

**नेवासा । विजय खंडागळे**

घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम (DV Act) अंतर्गत दाखल झालेल्या तक्रारीत ठोस पुरावे आढळून



न आल्याने, तसेच कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी पती वगळता इतर सर्व नातेवाइकांवरील प्रकरण रद्दबातल केले आहे.

अहिल्यानगरातील देवीचे धामनगाव येथील युवकाचा विवाह झाल्यानंतर पतीपत्नीमध्ये मतभेद वाढले व दोघेही विभक्त राहू लागले. त्यानंतर पत्नीने पती व कुटुंबातील सात जणांविरुद्ध कलम १२ इत्यादी अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात तक्रार दाखल केली होती.

या तक्रारीविरुद्ध पती व नातेवाइकांनी ॲड. गणेश प्रभाकर दरंदले यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज दाखल करून तक्रार रद्द करण्याची मागणी केली. न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत, ॲड. दरंदले यांनी पत्नीचे आरोप हे पतीच्या कुटुंबियांना त्रास देण्याच्या हेतूने केलेले असल्याचे, तसेच पतीपत्नी वेगळे राहत असल्याने इतर नातेवाइकांचा या वादाशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. सुनावणीनंतर न्यायालयाने तक्रार ही कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर असल्याचे नमूद करून पती वगळता अन्य सर्व नातेवाइकांवरील कारवाई रद्द करण्याचे आदेश दिले. या प्रक्रियेत ॲड. गणेश प्रभाकर दरंदले यांना ॲड. राहुल किशोर गारूळे यांनी सहकार्य केले.

## भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार जाहीर; सहा लेखकांचा होणार गौरव

**कोपरगाव । किसन पवार**

पोहेगाव येथील भि. ग. रोहमारे ट्रस्ट तर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, यंदा पांडुरंग पाटील (राधानगरी, कोल्हापूर), डॉ. हंसराज जाधव (पैठण), सचिन शिंदे (उमरखेड, यवतमाळ), सागर जाधव जोपुळकर (चांदवड, नाशिक), डॉ. नारायण शिवशेट्टे (अर्जापूर, नांदेड) आणि भारत सातपुते (गातेगाव, लातूर) या सहा लेखकांची निवड करण्यात आली. ही माहिती ट्रस्टचे अध्यक्ष अशोक रोहमारे आणि पुरस्कार योजना कार्यवाह डॉ. जिभाऊ मोरे यांनी दिली.

या घोषणावेळी विश्वस्त रमेश रोहमारे, संदीप रोहमारे, ॲड. राहुल रोहमारे आणि प्राचार्य डॉ. विजय ठाणगे उपस्थित होते.

१९८९ पासून ग्रामीण कादंबरी, कथासंग्रह, कविता संग्रह आणि समीक्षा या साहित्यप्रकारातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांना हा पुरस्कार दिला जात असून, २०२४ सालातील खालील ग्रंथांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.



‘नांगरमुठी’ पांडुरंग पाटील (ग्रामीण कादंबरी, दर्या प्रकाशन, पुणे) ‘मोहरम’ डॉ. हंसराज जाधव (ग्रामीण कथासंग्रह, लोकवाङ्मय गृह, मुंबई) ‘पातीवरल्या बाया’ सचिन शिंदे (ग्रामीण कविता संग्रह, अष्टगंध प्रकाशन, ठाणे) विभागून ‘माती मागतेय पेनकिलर’ सागर जाधव जोपुळकर (ग्रामीण कविता संग्रह, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे) विभागून ‘ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय : एक अभ्यास’ डॉ. नारायण शिवशेट्टे (ग्रामीण समीक्षा, स्वरूप प्रकाशन, छ. संभाजीनगर) विभागून ‘जागरण’ भारत सातपुते (ग्रामीण आत्मकथन, मांजरा प्रकाशन, लातूर) प्रत्येक ग्रंथाला १५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षी कविता संग्रह, समीक्षा आणि आत्मकथन या तीन साहित्यप्रकारांमध्ये पुरस्कार विभागून देण्यात आले आहेत.

ट्रस्टकडे आलेल्या ५९ साहित्यकृतींपैकी निवड समितीने वरील ग्रंथांची निवड केली. डॉ. दिलीप धोंडगे, डॉ. शिरीष लांडगे, लक्ष्मण बारहाते, डॉ. जिभाऊ मोरे आणि डॉ. विजय ठाणगे यांनी संयुक्तरीत्या परीक्षण केले.

निवड समितीने ‘नांगरमुठी’, ‘मोहरम’, ‘पातीवरल्या बाया’, ‘माती मागतेय पेनकिलर’, ‘ग्रामीण आत्मकथनात्मक वाङ्मय एक अभ्यास’ आणि ‘जागरण’ या ग्रंथांचे साहित्यिक वैशिष्ट्ये नमूद करून त्यांची प्रशंसात्मक नोंद केली आहे. तसेच काडीमोडातील काटे, बे दुणे शून्य, घामाचे संदर्भ, मृगपक्षी, शिदोरीच्या भाकरी, दंगल होतेच कशी, जमाखर्च आयुष्याचा या ग्रंथांचा उल्लेखनीय ग्रंथ म्हणून विशेष निर्देश करण्यात आला आहे. कै. के. बी. रोहमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन झालेला हा उपक्रम सामाजिक कृतज्ञतेतून गेली अनेक दशके राबवला जात असून, ग्रामीण नवलेखकांना प्रोत्साहन देणे हे ट्रस्टचे उद्दिष्ट असल्याचे अध्यक्ष अशोक रोहमारे यांनी सांगितले. आजवर १८३ हून अधिक लेखकांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भि. ग. रोहमारे साहित्य पुरस्कारांचे वितरण ता. ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता, कोपरगाव येथील के. जे. सोमैया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात होणार असून, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे आणि डॉ. सुधीर तांबे (माजी आमदार, विधान परिषद) असतील.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. संजीव कुलकर्णी (सचिव, कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी) आणि प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी केले आहे.

निवडणुकीच्या उत्साहात चिमुरडीचा गोड प्रचार

## ‘माझ्या आजोबांनाच मतदान करा’



**पाथर्डी । नितीन गटाणी**

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचाराची तापलेली लाट उसळली असून नेतेकार्यकर्त्यांसह काही ठिकाणी लहान मुलेही झेंडे हाती घेऊन दिसत आहेत. अशातच एका चिमुरडीने बाजारपेठेत फेरफटका मारत, ‘‘आमच्या आजोबांनाच मतदान करा’’ अशी भावनिक साद घालत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

प्रभाग क्रमांक ६ (ब) मधील भाजप उमेदवार नंदकुमार शेळके आणि प्रभाग ६ (अ) मधील किरण प्रतीक खेडकर यांच्या प्रचारात शेळके यांची नात आराध्या प्रशांत शेळके सक्रियपणे सहभागी होत आहे. दुकाने, घरे आणि परिसरात हातात प्रचारपत्रक घेऊन आराध्या करत असलेला प्रचार सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

शहरात रिक्षा, फ्लेक्स बोर्ड, सभाघोंगडी बैठका अशा निवडणूक वातावरणात आराध्याची निरागस उपस्थिती विशेष ठरत आहे. घरातील राजकीय वातावरण, आजोबांचे समाजकारणातील सक्रिय योगदान आणि दररोजच्या प्रचारफेऱ्या पाहून प्रेरित होऊन आराध्याने स्वतःहूनच प्रचारात उडी घेतली आहे

नंदकुमार शेळके यांनी अनेक निवडणुकांमध्ये विजय मिळवला असून त्यांच्या घरामध्ये समाजकारण आणि राजकारणाची परंपरा आहे. त्याचा परिणाम म्हणून आराध्याही प्रचारात उत्साहाने सहभागी होत असून, तिच्या चेहऱ्यावरचे निरागस स्मितहास्य आणि प्रेमभावना पाहून नागरिकही भावुक होत आहेत. चिमुरडीचा हा गोड प्रचार प्रभागात चर्चेचा विषय ठरत आहे.

## एकाच प्रभागातील दोन सहकारी डॉक्टर उमेदवारांत बाचाबाची

शहरातील मतदारांत खमंग चर्चा

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी नगरपरिषदेची निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यावर पोहोचल्यामुळे वातावरण तापले असतानाच दुसरीकडे सहकारी उमेदवारांमध्येच बेबनाव वाढत चालला आहे. मेडिकल क्षेत्रात कार्यरत असलेल्या एकाच पक्षातील व एकाच प्रभागातील दोन उमेदवारांत रंगलेला शाब्दिक चकमकीचा सामना शहरभर चर्चेचा विषय ठरला आहे. गमतीचा भाग म्हणजे शहराला परिचित असलेल्या ओपीडीमध्ये ठेकेदाराच्या मध्यस्थीनेच हा वाद नंतर मिटविण्यात आला असला तरी त्यातील धग मात्र अजूनही कायम आहे.

नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांतील नाराजी नाट्य संपविण्यासाठी विविध प्रकारच्या क्लृप्त्या वापरत, आमदार मोनिका राजळे नाराजांचा गैरसमज दूर करत त्यांना प्रचारात सक्रिय करण्यात आघाडीवर आहेत. अन्य प्रमुख पक्षांना उमेदवाराची टंचाई असल्यामुळे सुदैवाने त्यांच्याकडे असे नाराजी नाट्य नाही. गेल्या तीन दिवसांपूर्वी शहरातील दलितवस्ती परिसरात जुना नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व त्याच प्रभागात नव्याने उमेदवारी करत असलेल्या सहकारी उमेदवारांत स्वतंत्र प्रचार करण्याच्या कारणाने नाराजी उफाळून आली. नवीन उमेदवार म्हणाले, ‘‘तुमची प्रतिमा मला अडचणीची ठरत



असल्याने माझ्या मतांत घट होऊ शकते, त्यामुळे मी एकटा प्रचार करतो.’’ त्यांना उत्तर देताना दुसऱ्या डॉक्टर उमेदवाराचे पती म्हणाले, ‘‘मला न विचारता प्रचार करत फिरता, तुम्हाला त्याचे परिणाम कळतात का? तुम्ही नवीन आहात, या आखाड्यातील मी जुना खेळाडू आहे. मतदान यंत्र उघडताच मतांचा आकडा समजल्यावर तुम्हाला कळेलच. त्यामुळे, अशा पद्धतीने वागू नका.’’ अशा शब्दांत सहकारी डॉक्टर उमेदवाराला सुनावले. शब्दाने शब्द वाढत गेला... बघणारे बघत होते... याच प्रभागातील निवडक मतदार व शहरातील त्या भागातून वावरणारे नागरिक तेथे थांबू लागल्यानंतर दोघांनीही आवरतं घेतलं.

मताधिक्याबद्दल दोघांनाही पूर्ण विश्वास असल्याने दोघेही नमतं घ्यायला तयार नव्हते. विषय फार पांगून, नेतृत्वाकडून नाराजी व्यक्त होण्याअगोदरच यावर पांघरुण घातलेले बरे, असे धोरण ठेवत काही जणांनी हा वाद आपसांत मिटून घेण्याचा सल्ला त्यांना दिला. त्यानुसार दोघांच्याही जवळील असलेला ठेकेदार मध्यस्थ म्हणून बसला. दोघांनी एकत्रित प्रचार करायचा असा निष्कर्ष चर्चेतून निघाला. मध्यस्थाच्या कोणत्या औषधी गोळीला गुण आला हे मात्र समजू शकले नाही. तरीही काही प्रमाणात प्रचार स्वतंत्रपणे सुरू आहे. उमेदवाराला ज्या भागात एकट्याने प्रचार करणे सोयीचे वाटते, तेथे तो फिरतो. अनेक उमेदवार सहकारी उमेदवाराचे नाव सांगण्यापेक्षा, मतदार व स्वतः वैयक्तिक संबंध किती चांगले आहेत अशा मुद्द्यांनी चर्चा करत मतदारांशी संवाद साधतो. स्वतंत्रपणे प्रचार करण्याबाबत नेतृत्ववाने काही प्रभागांबद्दल नाराजी व्यक्त केली. या डॉक्टरद्वयीत झालेल्या चकमकीची शहरात खमंग चर्चा सुरू आहे. आमदार मोनिका राजळे जीवाचा आटापिटा करत प्रचार करत असताना, सुशिक्षित उमेदवारच मतदभेदाचे प्रदर्शन करत असतील तर मतदारांत संभ्रम निर्माण होणं साहजिकच आहे. विशेष म्हणजे हे दोन्हीही उमेदवार भाजपासारख्या स्वयंघोषित सुसंस्कृत पक्षाची उमेदवारी करत असून असंस्कृत वर्तनाचं प्रदर्शन करत आहेत. त्यामुळे, काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या प्रचारसभेत आमदार मोनिका राजळे यांनी, सर्व सुसंस्कृत उमेदवार दिले असल्याने त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्याच्या आवाहनाचं मातेरं झाल्याशिवाय राहणार नाही.

## एआय आधारित शेतीकडे वाटचाल

### कृषी विभागाच्या मार्गदर्शन सत्राचा समारोप



**शेवगाव । शिवाजी घुगे**

घोटण येथे तांत्रिक पद्धतीने शेतीकडे वाटचाल करण्यासाठी कृषी विभागातर्फे मार्गदर्शन सत्र घेण्यात आले. कृषी अधिकारी भाऊसाहेब काटकर यांनी एआय आधारित शेती विषयक महत्त्वपूर्ण माहिती शेतकऱ्यांना दिली.

यावेळी त्यांनी महाविस्तार या ॲपद्वारे शेतीतील अडचणी, हवामानातील बदल, कीडरोग नियंत्रण, पिकांचे संगोपन आणि उत्पादनाला योग्य बाजारभाव कुठे व केव्हा मिळू शकतो याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. काटकर म्हणाले की, या ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतीकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहण्यास मदत होते. हवामानाचा अंदाज, कीडनियंत्रण उपाय, कार्यशाळांची माहिती, तसेच तातडीच्या सूचना या सर्व सुविधा एकाच ॲपमध्ये उपलब्ध आहेत.नवीन पिढीला शेतीमध्ये आकर्षित करण्यासाठी एआय आधारित महाविस्तार ॲप उपयोगी ठरत असून, येणाऱ्या अडचणींवर वेळेत उपाययोजना करता येतात. त्यामुळे पिकांचे नुकसान टळून उत्पादनात वाढ होते, असेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आणि शेतीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी या ॲपचा जरूर वापर करावा, अशी विनंती कृषी अधिकारी भाऊसाहेब काटकर यांनी शेती बांधवांना केली.

किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

## भाव काय फुटणार याची चर्चा




श्रीरामपूर - पालिका निवडणूक आता अवघ्या तीन दिवसांवर आली आहे. उद्या आणि परवाचा दिवस गेल्यानंतर मंगळवारी मतदान होणार आहे. सर्वच प्रभागातील उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन संपर्क केला आहे. बाहेर गावच्या मतदारांना आणण्यासाठी गाड्यांचे नियोजन देखील अनेक भागातून होत आहे. हे सर्व होत असताना आता मतदारांमध्ये चर्चा आहे ती मतदानाच्या दिवशी भाव काय फुटणार आहे याची. आजमीतीस वेगवेगळ्या अफवा सर्वत्र जोर धरत आहेत . भाऊचे दोन हजार आणि खालच्या दोघांचे एक एक हजार असे चार हजार मिळणार अशी चर्चा एकीकडे आहे तर दुसरीकडे दादाचे एक हजार व खालच्या दोघांचे एक एक हजार असे तीन हजार मिळणार अशी ही वदंता आहे. मात्र मागील अनुभव पाहता या गोष्टींवर कोणी सहजासहजी विश्वास ठेवण्यास तयार नाही. यावेळी कोणालाही पैसे वाटू दिले जाणार नाही त्यासाठी मोठी यंत्रणा कामाला लागणार आहे असे सुद्धा सांगितले जात आहे. एकीकडे ही चर्चा असताना दुसरीकडे वैयक्तिक संपर्कावर जोर दिला जात आहे. मी आहे ना तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा माझ्यावर सोपवा तुमचे सगळे प्रश्न मी सोडवेल असा विश्वास उमेदवाराचे लोक मतदारांना देत आहेत. चांगले चांगले लोक लक्ष्मी दर्शन घेतल्याशिवाय बाहेर निघत नाही अशी खंत ही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे श्रीरामपूरातील निकाल काय लागेल याबाबत मोठा संभ्रम आज तरी आहे. यावेळी प्रभाग मोठे आहे त्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदारांकडून मतदान करून घेण्याची यंत्रणा राबविताना सर्वच पक्षांची दमछाक होणार असे दिसत आहे. एकाच ठिकाणी सर्व प्रभागाचे मतदान होणार असले तरी त्या ठिकाणी मोठी गर्दी होण्याची देखील शक्यता आहे. नगरपालिका प्रशासनाने प्रभाग रचना करताना कोणते निकष लावले याबाबत संभ्रम आजही कायम आहे. प्रशासनावर कोणाचा दबाव होता आणि कुणाच्या सांगण्यावरून ही प्रभाग रचना करण्यात आली याचा शोध घेतला जात आहे. अनेक विद्यमान नगरसेवकांना आपले भाग सोडून दुसऱ्या भागात यंत्रणा उभी करावी लागली. मागील अनुभव लक्षात घेता अनुभवी लोकांनी मतदान घडून आणण्यासाठी पूर्ण तयारी केल्याचे दिसून येत आहे. प्रभागातील गल्ली निहाय नियोजन करून कार्यकर्त्यांवर जबाबदारी निश्चित केली जात आहे त्यासाठी टीम देखील तयार झाल्या आहेत. हे सर्व होत असले तरी सर्वसामान्य मतदार एकच प्रश्न विचारत आहे . . . भाव काय फुटणार ?

## शालेय साहित्य वाटपातून पावसे कुटुंबीयांनी जपली सामाजिक बांधिलकी

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

जातधर्माच्या भिंती तीव्र होऊ लागलेल्या काळात समाजात सामंजस्याचा आदर्श निर्माण करणारी घटना संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे घडली. येथील बुद्ध विहारात मराठा समाजातील पावसे कुटुंबीयांनी आपल्या मुलीचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत अनोख्या पद्धतीने साजरा केला.

कु. पिऊ पावसे हिच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खाऊ वाटप तसेच स्नेहभोजन आयोजित करण्यात आले. भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून



बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा उपक्रम पार पडला.

हिवरगाव पावसा येथे मोठी बौद्ध वस्ती असून गावातील बुद्ध विहारात दर रविवारी बालसंस्कार वर्ग भरतो. अनेक समाजबांधव या उपक्रमास हातभार लावत असतात. याच परंपरेत महंत एकनाथ महाराज यांच्या कुटुंबीयांनी पिऊ पावसे हिचा वाढदिवस बुद्ध विहारात साजरा करण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांना साहित्य व खाऊ वाटप करून त्यांनी समतेचा, बंधुत्वाचा आणि सामाजिक सलोख्याचा आदर्श निर्माण केला.

जातधर्माच्या पलीकडे जाऊन गावकऱ्यांनी एकत्र येत हा वाढदिवस साजरा केल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शिवसेना (शिंदे) तालुकाध्यक्ष रमेश काळे यांनी पिऊ पावसे हिला शुभेच्छा देत पावसे कुटुंबाच्या या उपक्रमाचे स्वागत केले. ‘‘या उपक्रमातून प्रेरणा घेऊन इतरांनीही बुद्ध विहारात अशा पद्धतीने वाढदिवस साजरा करावा,’’ असे त्यांनी सांगितले.

एकनाथ महाराज म्हणाले की, ‘‘कृष्ण भक्तीने जीवनाची सुरुवात झाली तर मनात राम प्रकट होतो, आणि बुद्ध भक्तीने मोक्ष प्राप्त होतो हेच जीवनाचे सत्य आहे.’’ त्यांनी पिऊ पावसे हिच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला सरपंच सुभाष गडाख, भाजपाचे जिल्हा पदाधिकारी काशिनाथ पावसे, ज्येष्ठ संपादक यादवराव पावसे, वृक्षमित्र गणपत पावसे, भाजप तालुका सरचिटणीस गणेश दवंगे, शिवसेना (शिंदे) मागासवर्गीय सेल जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भालेराव, निवृत्त पोलीस निरीक्षक नारायण पावसे, भाऊसाहेब जाधव, कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे सचिव नितीनचंद्र भालेराव आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. शाहीर मधुकर भालेराव यांच्या गाण्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सोमनाथ भालेराव, बाळासाहेब भालेराव, गणेश दवंगे, सोमनाथ दवंगे, साई भालेराव, पंकज भालेराव, मुकेश दरोळे आणि गावकऱ्यांनी पुढाकार घेतला.

# चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती

गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला ४०० पेक्षा अधिक धावांनी नमवून दक्षिण आफ्रिकेने भारताला २ – ० असे नमवून व्हाइट वॉश दिला. क्रिकेट रसिकांसाठी हा पराभव धक्कादायक होता कारण पहिल्या कसोटीतही दक्षिण आफ्रिकेने भारताचा असाच लाजिरवाणा पराभव केला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर क्रिकेट प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि ते साहजिकही आहे कारण भारतीय भूमीवर झालेला हा भारताचा पहिलाच पराभव नाही. मागील वर्षी न्यूझीलंड संघानेही भारताचा असाच लाजिरवाणा पराभव करत मालिका ३ – ० ने जिंकत भारताला असाच व्हाइट वॉश दिला होता. वर्षभरात दोनदा परदेशी संघाने भारताला भारतात येऊन हरवले ते ही अतिशय लाजिरवाण्या पद्धतीने त्यामुळे क्रिकेट प्रेमींमध्ये नाराजीची भावना पसरली आहे. पूर्वी भारतात येऊन भारताला हरवणे हे परदेशी संघासाठी मोठे दिव्य होते. भारतीय भूमीवर भारत अपराजितच होता. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा कोणत्याच संघाला भारतात येऊन मालिका विजय मिळविणे शक्य नव्हते. मालिकेतील एखादा दुसरा सामना ते जिंकायचे पण मालिका मात्र भारतच जिंकायचा. भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश देणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती पण आता मात्र परदेशी संघासाठी ते सहज शक्य झाली आहे. असे काय कारण आहे की भारतीय संघ आपल्याच भूमीवर जिंकू शकत नाही असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे याचे सरळ आणि साधे उत्तर आहे ते म्हणजे चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती. या कसोटी मालिकेसाठी जो भारतीय संघ निवडला होता तोच मुळी कसोटी क्रिकेटच्या योग्यतेचा नव्हता. या कसोटी मालिकेसाठी जो संघ निवडला त्यातील किती खेळाडू हे कसोटी खेळण्याच्या लायक होते ? हा संशोधनाचा विषय आहे. या संघात जे फलंदाज निवडले त्यांच्याकडे कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्र आहे का तर याचे उत्तर नाही असेच देता येईल. कसोटी मालिकेसाठी निवडलेला संघ कसोटी दर्जाचा नव्हता. या संघात निवड झालेले खेळाडू हे आयपीएल गाजवलेले धुरंदर होते. टी २० आणि कसोटी क्रिकेट यात जमीन अस्मानचा फरक आहे. कसोटीसाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. फिरकी गोलंदाजी खेळण्यासाठी जे तंत्र लागते ते एकाही फलंदाजाकडे दिसले नाही. निवड समितीने जी चूक केली तीच किंबहुना त्याहून मोठी चूक संघ व्यवस्थापनाने केली. या मालिकेत संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसलेली दिसली. संघ व्यवस्थापनाने रचलेली एकही चाल यशस्वी ठरली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन संघाची घडी बसवताना गोंधळलेला दिसला. पहिल्या कसोटीत चक्क चार फिरकी गोलंदाज खेळवण्यात आले. चार फिरकी गोलंदाज खेळवण्याची संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसली. चार फिरकी गोलंदाज खेळवल्यामुळे एक फलंदाज कमी पडला. त्यात शुभमन गिल जायबंदी झाल्यावर आपल्याकडे फलंदाजच उरला नाही कारण यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत हे कसोटीतही टी २० चा खेळ खेळतात.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

ध्रुव जुरेल हा नवखा फलंदाज असल्याने त्याच्याकडून जास्त अपेक्षा नव्हत्या. उरला एकटा के एल राहुल पण तो ही फॉर्मात नाही मग धावा करणार कोण ? जी गत पहिल्या कसोटीत झाली तीच गत दुसऱ्या कसोटीतही झाली. दुसऱ्या कसोटीत एक फिरकी गोलंदाज कमी करून नितीश कुमार रेड्डी याला खेळवण्यात आले पण त्याने दुसऱ्या कसोटीत ना गोलंदाजीत विकेट घेतल्या ना फलंदाजीत धावा काढल्या. विशेष म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला फक्त एकच षटक गोलंदाजी दिली. त्याला जर गोलंदाजीच द्यायची नव्हती तर मग त्याला खेळवलेच का ? त्याच्या ऐवजी एक स्पेशलिस्ट फलंदाज खेळवला असता तर किमान भारताच्या काही धावा वाढल्या तरी असत्या. पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या वॉशिंग्टन सुंदर दुसऱ्या कसोटीत थेट आठव्या क्रमांकावर आला. दुसऱ्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आलेला साई सुदर्शन फक्त हजेरी लावून गेला. ध्रुव जुरेलनेही तेच केले. या दोघांनी इंग्लंड दौऱ्यावर देखील काहीच केले नव्हते तरीही त्यांची निवड करण्यात आली. जर योग्य खेळाडूंची निवड झाली असती आणि रणनीती फसली नसती तर असा लाजिरवाणा पराभव झाला नसता. म्हणजेच चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती यामुळेच हा लाजिरवाणा पराभव भारतीय संघाला स्वीकारावा लागला. या पराभवातून धडा घेऊन बीसीसीआयने निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला बरखास्त करायला हवे. बीसीसीआयने नवीन निवड समिती आणि नवा प्रशिक्षक लवकरात लवकर नियुक्त करायला हवा. प्रशिक्षकपदी गंभीर आल्यापासून भारतीय संघाची पिछेहाटच होत आहे विशेष म्हणजे सतत पराभव होऊनही गंभीर आपली रणनीती बदलायला तयार नाही तर निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर हे चुकीची संघ करत आहे. या दोघांचीही गच्छंती करण्याची वेळ आली आहे जर या दोघांना आणखी अभय दिले तर या पराभवाची पुनरावृत्तीच पहायला मिळू शकते.

## हिंसक प्रकाराने श्रीरामपूरकर अस्वस्थ

# विकासाच्या मुद्द्यावरून गाडी घसरली

**कधीकाळी मुंबईचं पिल्लू म्हणून समजलं जाणारं श्रीरामपूर शहर आज योग्य नेतृत्वाअभावी भरकटत चाललंय. त्यामुळे शांतताप्रेमी खरा श्रीरामपूरकर मात्र चिंतातुर आहे. विचार स्वातंत्र्यावर देखील गदा आणणाऱ्या या घटना भविष्यातील श्रीरामपूर कसं असेल? याबाबत प्रत्येक श्रीरामपूरकराला विचार करायला भाग पाडत आहे.**

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

चार वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर एकदाची नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली आणि सर्वच पक्ष कामाला लागले.एकीकडे प्रचार जोर धरत असताना परवा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर यांना हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांकडून मारहाण झाली आणि तो शहरात आणि जिल्ह्यात नव्हे तर राज्यात चर्चेचा विषय झाला. हा प्रकार मारहाणी पुरता मर्यादित नाही तर यामुळे शहराच्या भवितव्याचा आणि भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्रीरामपुरात होणाऱ्या निवडणुका या नेहमी लक्षवेधी असतात. गोविंदराव आदिक, भानुदास मुरकुटे, जयंत ससाणे यांच्या काळातील निवडणुका या प्रचाराच्या आगळ्या आणि वेगळ्या नियोजनामुळे राज्यभर गाजत असत. आजही श्रीरामपूरची निवडणूक गाजतेय ती दहशतवाद,गुंडगिरी आणि विषारी प्रचाराने. कधीकाळी जातीय सलोखा आणि शांततेचं शहर म्हणून राज्यामध्ये ख्याती असणारं श्रीरामपूर आज जातीपातीच्या विषारी संकटात सापडलेल्या दृष्टीस पडत आहे. याचे कारण तालुक्याला आणि शहराला भक्कम नेतृत्व नसल्याने शहराची ही वाताहात झाली आहे. कुणीही उठावं आणि काहीही करावं. कुणाचाही धाक,सामाजिक तालुक्याचे भान,बाजारपेठेची खालावत चाललेली स्थिती याबाबत कोणीच लक्ष घालणारं नसल्याने शहर आज पोरकं झालंय. शहराचे नागरिकांसाठी असलेले मूलभूत प्रश्न आज बाजूला पडले असून ज्या प्रश्नामुळे समाज दुभंगला जातो, विकासाला खेळ बसते, आर्थिक परिस्थिती सुधारणा ऐवजी खालावते, प्रगती ऐवजी अधोगती होते अशी परिस्थिती आता निर्माण केली जात आहे.

निवडणूक नगरपालिकेची आहे. त्यामुळे शहराच्या विकासाच्या प्रश्नांची चर्चा अपेक्षित आहे. श्रीरामपूर शहराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणत्याही एका विशिष्ट जातीचे किंवा समाजाचे प्राबल्य नाही. बिनवेशीचे गाव म्हणून गणले जाणारे श्रीरामपूर अठरापगड जातीच्या लोकांनी मिळून वसलेले आहे. येथील सर्व लोक एकमेकांवर अवलंबून आहेत. सगळ्यांचे संबंध अतिशय सलोख्याचे आहेत. परंतु गेल्या काही वर्षात शहरांमध्ये नको ते प्रश्न चर्चिले गेले यातून काही विशिष्ट भागामध्ये विशिष्ट विचारधारा तयार झाली. त्यामुळे शहराच्या विकासाला खिळ बसली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा विषय मागील वीस वर्षांमध्ये जाणीवपूर्वक पेटता ठेवण्यात आला होता. निवडणूक आली की तो विषय चर्चेला यायचा आणि निवडणूक झाली की विषय बंद व्हायचा. परंतु पालकमंत्र्यांनी या प्रश्नात लक्ष घातले. त्यांनी निधी उपलब्ध करून दिल्यामुळे आज छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा शिवतीर्थ च्या रूपाने शहरात साकारला गेलाय. पण हा एक मोठा विषय मार्गी लागल्याने एका गटाला तो पचनी पडलेला दिसत नाही. शासकीय नियम आणि परिस्थिती माहीत असताना सुद्धा जाणीवपूर्वक या प्रश्नाला हिंदू – मुस्लिम असा रंग देण्याचा प्रयत्न देखील झाला. सर्वोच्च न्यायालयाचे नियम आणि शासनाच्या गृह खात्याचा अहवाल यामुळे या पुतळ्याच्या ज्या जागेवरून याबाबत राजकारण झाले त्या जागेवर पुतळा उभारणे शक्य नव्हते हे माहीत असूनही या विषयावर हीन दर्जाचे राजकारण झाले. एकदाचा हा विषय मार्गी लागला आणि या प्रश्नावरून चालणाऱ्या दुकानदाऱ्या या बंद झाल्या. दुसरीकडे ज्या प्रश्नांचा सामाजिक आणि धार्मिक विषयाशी संबंध येतो असे काही विषय निर्माण करून शहराची विभागणी सरळ दोन गटात किंवा भागात करण्याचे प्रयत्न होत आहे. दुर्दैवी बाब म्हणजे श्रीरामपूर शहराच्या या घडामोडींमध्ये बाहेरच्या लोकांचा जास्त हस्तक्षेप दिसून येतो. त्यामुळे विषय विनाकारण वाढत असल्याचे दिसते. शहरातील नागरिक हे शांतता प्रेमी आहेत. एकमेकांशी अनेक वर्षांचे सलोख्याचे संबंध आहेत. राज्यात प्रसिद्ध असलेला उरूस व रामनवमीची यात्रा यातून निर्माण होणारा सलोखा आजही चर्चिला जातो. परंतु आता यातही राजकारण आले आहे. नवीन पिढी याबाबत कोणता बोध घेणार याचा विचार कोणीही करताना दिसून येत नाही. शहराची प्रगती होण्यासाठी सर्व शहरवासीयांमध्ये सामंजस्य व सलोखा असणे आवश्यक आहे. एकमेकांच्या दुकानातून व्यवहार करताना कोणीही कधी जातीपातीचा विचार करीत नाही.असे म्हणतात की व्यापाऱ्याला जात नसते. कारण सर्व जाती धर्माचे ग्राहक त्याच्याकडे असतात. आजही श्रीरामपूरातील काही व्यापारी पाहिले तर असे लक्षात येते की लोक कोणताही विचार न करता त्यांच्या दुकानातून सामान खरेदी करतात. यातून शहरातील सामंजस्य आणि सलोखा दिसून येतो.

**मागील वर्षात शहरांमध्ये राबविल्या गेलेल्या अतिक्रमण विरोधी मोहिमेने शहर बेचिराख झाले आहे. फारशी गरज नसताना राबवली गेलेली ही अतिक्रमण विरोधी मोहीम अनेक व्यावसायिकांना बेघर करून रस्त्यावर सोडून गेली. त्यांचे पुनर्वसन कसे होणार त्याबाबतची पावले लवकरात लवकर कशी उचलली जाणार याबाबत कोणताही पक्ष चर्चा करताना दिसत नाही. उलट रेल्वेच्या अतिक्रमणाची टांगती तलवार लोकांच्या डोक्यावर आहे.**

सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे श्रीरामपुरामध्ये गेल्या काही काळात अशा घटना घडत असताना जुनी,अनुभवी, जाणती मंडळी गप्प होती.तरुण मुलं कुणाचं ऐकत नाही एवढं सांगून हे सर्व शांत बसले.त्यातून नको ते प्रकार वाढले आणि आज शहर विसंवादाच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहे. ही सर्व परिस्थिती बदलण्यासाठी समंजस, अनुभवी,सर्वंकष विचार करून शहराच्या शांततेचा विचार करणारं नेतृत्व हवं आहे .सातत्याने समाजातील एका वर्गाला टार्गेट करून आपली राजकीय पोळी भाजून घेणारे नेतृत्व हे शहरासाठी घातक आहे.

शहराच्या विकासाचा समतोल साधण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन जाणारं नेतृत्व आज अपेक्षित आहे. यासाठी शहरवासीयांनी येणाऱ्या निवडणुकीमध्ये अतिशय जबाबदारीने आणि जाणीवपूर्वक मतदान करून हे शहर चांगल्या लोकांच्या ताब्यात दिलं पाहिजे तरच श्रीरामपूरच्या भावी पिढीचा भवितव्य आहे,अन्यथा श्रीरामपूर चे भविष्य अंधकारमय आहे याची नोंद शहरवासीयांनी घेण्याची आवश्यकता आहे.

# कोपरगाव आगाराचा ढिसाळ कारभार; वारंवार नादुरुस्त बसमुळे प्रवाशी संतप्त



**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव त्र्यंबकेश्वर एम एच ४० एक्यू ६०३२ या बस मुळे पुन्हा एकदा प्रवाशांचा संयमाचा बांध तुटला. ता. २७ नोव्हेंबर रोजी सायं. ४.१५ वाजता जेऊरकुंभारी फाट्यावर ही बस अचानक नादुरुस्त झाली. गिअर अडकल्याने बस जागीच थांबवावी लागली, अशी माहिती चालकाने दिली. परिणामी दीड तास प्रवासी रस्त्यावर उभे राहून ताटकळत राहिले. तंत्रज्ञ येऊन बस दुरुस्त केल्यानंतरच प्रवास पुढे सुरू होऊ शकला.

अवघ्या दहा दिवसांपूर्वी साईबाबा मंदिराजवळ बस बंद पडून प्रवाशांना दोन तास खोळंबा झाला होता. त्याचप्रमाणे ता. १५ रोजी नाशिक जाणारी बस झगडे फाटा येथे नादुरुस्त होण्याची घटना घडली. दर पंधरवड्याला बस रस्त्यात थांबते, प्रवासी रस्त्यावर उभे राहतात आणि कोपरगाव आगार मात्र ठोस उपाययोजना करण्यात अपयशी ठरते, अशी सर्वसामान्यांची भावना झाली आहे.

प्रवाशांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास दिवसेंदिवस वाढत असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप निर्माण झालेला आहे. ''अनेक वेळा कोपरगाव आगाराच्या बस बिघाड झाल्याने रस्त्यात अनेक प्रवाशी सर्व बाहेर उभे असलेले दिसून येत आहेत, हे अतिशय खेदजनक आहे. कोपरगाव आगारात नेमके चालले तरी काय असा प्रश्न पडतो आहे. प्रशासनाने यावर तातडीने प्रभावी उपाययोजना करावी, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करणे भाग पडेल,'' अशी कठोर प्रतिक्रिया जालिंदर चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य, जेऊर कुंभारी यांनी व्यक्त केली.वारंवार घडणाऱ्या घटनांनी कोपरगाव आगाराच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि सुविधांचा प्रश्न गंभीर होत असताना प्रशासनाने आता तरी सजग होऊन तातडीने सुधारणात्मक पावले उचलावीत, अशी सर्वत्र मागणी होत आहे.

# तुका म्हणे भोळा । जिंकू जाणे कळीकाळा ।।

**जग जिंकण्याची ताकद भोळ्या माणसांत असते, असे तुकोबाराय म्हणतात. कारण, भोळा माणूस राग–द्वेष, खरे–खोटे या सगळ्या गोष्टीपासून वेगळा असतो. माझ्या जीवनातही अशीच एक व्यक्ती लाभली ती म्हणजे माझी चुलती (बाई) अर्थात सिताबाई मेटे. बाईचे शनिवारी (ता. २२ नोव्हेंबर) निधन झाले. तिच्या आठवणी एकदम डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. त्यामुळं बाईबद्दल लिहावं वाटलं. म्हणून हा शब्दप्रपंच...**



एकत्र कुटुंबात आजीआजोबा, चार चुलते, चार चुलत्या, आम्ही ६ भावंड, ८ बहिणी असा २४ माणसांचा परिवार. ४० एकर दुष्काळी शेती, १८ खन माळाद, बरडावर जनावरांचा गोठा त्यात २ मोठ्या म्हशी, ३ वगारं, २ बैलं, १ गावरान गाई, २ ते ३ गोऱ्हे व कालवडी, खंडीभर शेरडा, एक घोडी, एक शिंगरु, अशी काय ती आमची प्रॉपर्टी. पिढ्यानपिढ्याची वारकरी परंपरा आणि सुसंस्कारी कुटूंब म्हणून परिसरात आमच्या घराकडे बघण्याचा दृष्टीकोन. परंपरागत जागरण गोंधळ करत म्हणून मराठा असूनही लोक आम्हाला गोंधळी म्हणत. पावसावरची शेती. पिकं म्हणाल तर ज्वारी, बाजरी, करडई, हरभरा, हुलगा, मटकी, जवस ही पावसावर येणारी पिकं. आख्या शेतात वर्षाकाठी ३ कणगी टाचुन ज्वारी. आमचे चुलते कुटूंब प्रमुख म्हणजे कारभारी. बाजारला गेले अन केळीचा एक डझन आणली तर एकच केळ वाटायला यायचं. सणाच्या दिवशी मला घरी जायला उशीर झाल्यावर बाई एक कुरडई दोन भजे लावुन ठेवायची. दिवाळीत पाहुणा जेवायला आला तर एक लाडू दोघांत मिळायचा. दुध, ताक, दही भरपूर, खावा पण विकतचं काही मागायचं नाही ही शिकवण. ज्वारी, बाजरीची भाकरी कायम, पाहुणे आले तरच चपाती मिळायची. हुलगा, मटकीचे कालवण दररोजचेच. बाजारातून आणलेले बटाटा, टोमॅटो वगैरे भाजी कधीतरी. असा आमचा खटल्याचा प्रवास...

पाचवी – सहावीत असताना माझे वडील हमाली करायला पनवेलला गेले. काही दिवसांनी वडीलांच्या खाण्याची सोय नसल्याने नानी (माझी आई) भाकरी घालायला पनवेलला गेली. मलाही पनवेलला शाळेत जावं वाटत होतं, पण माझ्या आजोबांनी मला तिकडे जावू दिलं नाही. याच्या बापाने शाळेचं तोंड बघीतलं नाही. एकुलतं एक पोरगं बिघडलं तर आनंदाचा (वडील )संसार काही निट होणार नाही , ही आजोबांची भावना होती. गावाकडे दोन चुलते राहत होते. बापू आणि दादा त्यांच्याजवळ मोठी बहिण गोदा आणि मी दोन बहिण भावंडे राहिलो. त्यांच्याकडे असताना गुरं, शेळ्या वळणे, औत हाकणे, नांगर हाकणे, खुरपणे, ज्वारी काढणे अशी सगळी शेतीची कामे केली. कोणतेही काम मी अगदी आनंदाने करायचो. त्यामुळं मी सगळ्यांचा आवडता. काम सांगीपर्यंत निम्मे काम करत असे. पुढे आम्ही बेगडे निघालो. आई वडील पनवेलला असताना माझे चुलते बापू आणि बाईने आम्हा बहिण भावंडांना आतोनात जीव लावला. म्हणूनच मी त्यांच्याजवळ राहण्याचा निर्णय घेतला. अजुनही गावाकडं गेल्यावर नगरला निघताना आई वडील आणि बापूंचे, बाईचे दर्शन घेतल्याशिवाय निघत नाही.

शुक्रवारी ७ तारखेला वाहिरा ते आळंदी दिंडी प्रस्थान झाले. ८ आणि ९ तारखेला साहित्य संमेलन असल्याने दिंडीत सामिल होऊ शकलो नाही. दोन दिवसांत मागून जाऊ असा विचार झाला. मंगळवारी दिंडीत सामिल होण्यासाठी पिशवी भरली आणि बंधू सोमनाथ महाराजांचा फोन आला, बाईला अटॅकचा त्रास संभवतोय नगरला पाठवत आहे. हॉस्पिटलमध्ये बाई तीन दिवस अॅडमीट होती. आता इथेच बाईची सेवा हीच आपली आळंदी हे मी गृहीत धरलं होतं. सर्व तपासण्या केल्या, अँजिओग्राफी केली. तपासणीत डॉक्टरांनी सर्व काही ठीक असल्याचे सांगितले अन् बाईला गावाकडे नेऊन सोडले. ३/४ दिवस पुर्ण बाईसाठी दिले होते, तिची सेवा केली होती पण ही शेवटची सेवा असेल असे कधी वाटले नाही. बाई आता ठीक झाली, काही काळजी नाही म्हणून दोन दिवसांपूर्वीच गावाकडे जावून आलो होतो. शनिवारी रात्री जेवायला बसलो अन् सोमनाथ महाराजांचा फोन आला. बाई गेली. तसाच उठलो अन् घर गाठलं. रोज किर्तन प्रवचनातून हजारो लोकांना ज्ञानाचे डोस पाजणारा, अनेकांना धीर देणारा मी धायमोकलून रडायला लागलो. बाईच्या आठवणी जाग्या होत होत्या. माझ्या आईपेक्षाही जिने प्रेम दिलं ति बाई जगाचा निरोप घेवून गेली हे मानायला मन तयार नव्हतं.

बाईला दोन मुलं सोमनाथ महाराज आणि रेवन्नाथ आणि एक मुलगी राधा .पण या तिघांपेक्षा माझ्यावर विशेष जीव होता. मागील काही महिन्यापूर्वी बाई म्हणाली होती 'सिद्धू माझे कधी डोकं दुखतं, कधी पोट, कधी पाठ, कधी गुढगे, काहीबी दुखतंय मला एखाद्या मोठ्या दवाखान्यात नेवून सगळं चेक करुन आण... ' बाईची तीही इच्छा पूर्ण केली. अन शेवटी शनिवारी बाईने संध्याकाळी नातू बाबुचा वाढदिवस साजरा केला. कुटूंबातील सर्वांनी एकत्र जेवण केलं ,आन् श्वास घ्यायला त्रास होतोय म्हणून गावातल्या दवाखाण्यात नेले. इंजेक्शन देऊ पर्यंत बाईने प्राण सोडला. माझी बाई भोळी होती, प्रेमळ होती, कधीही कोणालाही दुखवले नाही. कोणी काही म्हणले तरी कधी रागवली नाही. कोणत्याही माणसाशी भेटल्यावर विचारपुस केल्याशिवाय पुढे गेली नाही. अशी माझी बाई पुन्हा होणे नाही.

मला नेहमीच आईची माया देणारी माझी बाई गेल्याने अतीव दुःख झालं आहे. आमच्या कुटूंबात वारकरी परंपरा असल्याने नेहमीच कीर्तनकार, टाळकरी, भजनी, वारकरी यांचा नियमित वावर असायचा. या सर्व वारकऱ्यांचे चहापान, जेवण असं सर्व काम बाईने मनोभावे केलं. बाईच्या मनात मोठी सेवाभावी वृत्ती होती. अनेक वारकऱ्यांची, कीर्तनकारांची सेवा बाईने केली. सर्वांची आस्थेवाईक विचारपूस करण्याची सवय होती. त्यामुळं अनेकांना बाईने लळा लावला. अश्या आमच्या बाईने कायमचाच निरोप घेतला. तिचा दशक्रिया विधी सोमवारी १ डिसेंबर रोजी आहे. बाईच्या स्मृतीस विनम्र अभिवादन..!

**बाईचा लाडका,**
**सिद्धू**
(लेखक हे संत शेख महंमद महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष आहेत)